ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

EDITOR IN CHIEF
Dr. BALAJI KAMBLE

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Nodal Anatomy of two Lantana Species in Verbenanceae<br>**Dr. R. G. Pawar** | 1 |
| 2 | Growth and development of non-Banking Financial Companies in India<br>**Dr. Rahul S. Kharabe** | 6 |
| 3 | On the structural studies of Aurivillius-Type Structure Ceramic $Ca_{(1-x)}Sr_{(x)}Bi_2Nb_2O_9$ composition<br>**Shivanand Masti** | 16 |
| 4 | A Study on Anthropometric Variables of Cricket Players to Develop Talent Identification Model for Cricket<br>**Dr. S. R. Bhosale** | 22 |
| 5 | भारतातील कृषी बाजार : एक अभ्यास<br>**ज्ञानोबा व्यंकटराव मुंढे, डॉ. एल. एच. पाटील** | 31 |
| 6 | भारतीय कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने<br>**डॉ. अलका अनिल मानकर** | 35 |
| 7 | किवी फळाचे आहारातील महत्व : एक अभ्यास<br>**डॉ. मिनल गावंडे** | 41 |
| 8 | जागतिकीकरणाचा विविध क्षेत्रातील व्यावहारिक मराठी भाषेवरील परीणाम<br>**डॉ. नम्रता बागडे** | 45 |
| 9 | स्वातंत्र्योत्तरकालीन ग्रामीण साहित्य स्वरुप<br>**डॉ. गौतम झरिबा ढवळे** | 49 |
| 10 | 'उपरा' प्रस्थापित व्यवस्थेविरूद्धचा विद्रोह<br>**डॉ. सुनिल आनंदराव राठोड** | 54 |

6

# भारतीय कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने

**डॉ. अलका अनिल मानकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय,
नांदुरा रेल्वे, जि. बुलढाणा

Research Paper - Economics

## प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्ष पूर्ण झाली या काळात भारताने केलेली प्रगती गौरवास्पद आहे. अर्थात देशाने सर्वच क्षेत्रात प्रगती केली असली तरी अजूनही काही क्षेत्र मुलभूत विकासापासून वंचित आहेत. प्रामुख्याने शेती संदर्भात विचार केला तर शेती हा भारतातील सर्वात जुना आणि परंपरागत व्यवसाय आहे.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून तर आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात देखील भारत . कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. कारण आजही जवळजवळ ६५: लोककृषीवर निर्भर आहेत. देशाच्या लोकांचे भरणपोषण कृषीतून उत्पादित होणाऱ्या अन्नाधान्यातुनच होते. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा स्त्रोत शेती हाच आहे. लोकांच्या रोजगाराचे, औद्योगिक विकास, व्यापाराचा मुख्य आधार शेती असल्यामुळे जोपर्यंत आधारभूत शेतीक्षेत्राचा विकास होत नाही तोपर्यंत आपल्या मर्यादित साधनाद्वारे आर्थिक विकासाचा उच्च दर प्राप्त करू शकत नाही. स्वातंष्यानंतरच्या काळात कृषी विकासावर अधिक भर देण्यात आणि भारतात नियोजन पद्धतीव्दारे .षीचे स्वरूप, स्थान आणि महत्वात बरेच बदल झाले आहेत. आज पूर्वीच्या तुलनेत भारतीय .षीची उत्पादकतावाढलेली आहे. स्वातंष्योत्तर काळात भारताला बऱ्याच काळपर्यंत अन्नधान्याची आयात करावी लागली होती. आज भारत मात्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपूर्ण बनला. .षीतून उत्पादित होणाऱ्या कच्चा मालावर प्रक्रिया करणारे उद्योग वाढत आहेत. त्यामुळे औद्योगिक विकासाचा वेग वाढला भारतातून जी निर्यात केली जाते. त्यात कृषीचा वाटा १०: वर आहे. विदेशी चालानाप्राप्तीचे कृषी हे महत्वाचे साधन आहे. परंतु अद्यापही स्वतंत्र भारताच्या अमृत महोत्सवी भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या कृषी क्षेत्रावर

अनेक आव्हाने उभी आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय .षी क्षेत्रासमोरील आव्हानाचा विचार केला गेला. शेतीचा इतिहास फार जुना असून मानव रानटी अवस्थेत असतांना जंगलातील जनावरे प्राणी यांची शिकार करून त्यावर उदरनिर्वाह करीत असे. मनुष्य पुढे वसाहती करून राहू लागल्यावर पिकांचे संवर्धन केले जाऊ लागले. मानवाने बुद्धीच्या बळावर अवजारांचा शोध लावल्यापासून तो नवीन पद्धतीने शेती करू लागला. आधुनिक युगात औद्योगीकरणाचा विस्तार व विकास जगभर मोठ्या प्रमाणात झाला असला तरी आजही .षी व्यवसाय हा जगातील सर्वात मोठा व्यवसाय समाजाला जातो कृषी विकासाचे महत्व स्पष्ट करतांना प्रसिद्ध अर्थतज्ञ प्रा. शुस्तझ म्हणतात की, “कोणतेही अल्पविकसित राष्ट्र अन्न धान्याच्या बाबतीत स्वंय निर्भरता प्राप्त केल्याशिवाय आर्थिक विकासाची कल्पना करू शकत नाही”.

**प्राचीन भारतातील शेतीचा विकास :—**

नव अश्मयुगाचा काळ इ.स.पु. १००० वर्षाचा गणला जातो. शेतीला नव अश्मयुगात सुरुवात झाली असून तत्कालीन लोक गाई, बैल. घोडा इ जनावरे पाळीत. यानंतरच्या ताम्रापाषण युगाच्या काळात म्हणजे इ.स. पु. ५००० ते ३००० मध्ये लोक शेती करून पक्की घरे बांधून स्थायिक झाले त्यावेळी शेतीत बरीच प्रगती झाली. ऐतिहासिक माहितीनुसार पहिली शेती खिस्तपूर्व ५००० वर्षापूर्वीची इजिप्त आणि बोब्रीलोन येथील शेती होय. प्राचीन काळी बहुतांश सर्व संस्.तीचा विकास नद्याच्या काठी झालेला दिसतो याचे कारण तेथील शेतीमधून भरपूर धान्य प्राप्त होत असे.

इ.स.पू. २०० ते इ.स.पू ४०० या वैदिक काळात भारतात आर्याचे वास्तव्य असून त्यांच्या मुख्य व्यवसाय शेती होता. आर्यांना भारतात येण्यापूर्वी कृषी विद्या अवगत होती असे आढळून येते. ऋग्वेद व अथर्व वेद यातही कृषी विषयक अनेक उल्लेख आढळतात. तसेच मौर्यकाल, बौद्धकाळ, व मोगल कालखंडात शेती व्यवसाय आधुनिक पध्दतीने केला जाऊ लागल्याने या काळात शेती व्यवसायाची प्रगती झाली. ब्रिटीश काळात शेती व्यवसाय फारसा झाला नाही कारण ब्रिटीशांची धोरणे भारतीय शेती विकासात फारशी अनुकूल नव्हती. त्यांचा अधीकधिक भर शेतीमधून शेतसारा गोळा करणे हा होता. ब्रिटीशांची कृषी विषयक प्रतिकूल धोरणे, जुनाट उत्पादन तंत्र, शेतीविषयक पारंपारिक .ष्टीकोन, शेतकऱ्यांचे अज्ञान या सर्वांचा परिणाम स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय शेती क्षेत्र अविकसित राहिली. शेतीची उत्पादकता अल्प होती. त्याचा परिणाम भारतात पडणारा अन्नधान्याचा तुटवडा स्वातंष्यपूर्व काळात अन्नधान्याच्या टंचाईमुळे भारताला विदेशातून अन्नधान्याची आयात करावी लागत होती.

स्वातंष्यप्राप्तीनंतर भारताने अन्न धान्य उत्पादनामध्ये स्वावलंबी बनण्याकरिता विशेष प्रयत्न सुरु केले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५०—५१ पासून भारतात नियोजन पद्धतीचा अवलंब केला गेला. नियोजनबद्ध विकासाच्या प्रयत्नामध्ये कृषी विकासावर अधिकाधिक भर दिला गेला. नियोजनामध्ये मुख्य उद्देश वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरविणे, वाढत्या उद्योगधंद्यांना पुरेसा कच्चा माळ पुरविणे वाढत्या लोकसंख्येबरोबरच वाढत जाणाऱ्या श्रमिकांना रोजगार पुरविण्यासाठी कृषी विकास करणे आवश्यक होता. स्वातंष्यप्राप्तीनंतर .षी विकासाकरिता संस्थात्मक सुधारणा व तांत्रिक सुधारणा असा दुहेरी कार्यक्रम राबविण्यात आला. जमीनदार, जहागीरदार, इमानदार, इ चे उच्चाटन करून कुळांना जमिनी ताबा मिळवून देणे शेतीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण करणे, जमिनी ताबा मिळवून देणे, शेतीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण करणे, जमिनधारणेवर कमाल मर्यादा घालणे इ. बाबत कायदे करण्यात आले. त्याचा परिणाम काही प्रमाणात उत्पादन वाढले. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनामध्ये कसेल त्याची जमिन हे तत्व अमलात आणल्याने जमिनीत सुधारणा होवू लागली नियोजनाच्या १५ वर्षात पाण्याखालची जमिन सुमारे ७५टक्के वाढली.जमिनीची दर हेक्टरी उत्पादकता वाढविण्याकरिता शेतीचे तंत्र सुधारणे अपरिहार्य झाले. अन्न धान्य उत्पन्न वाढविण्याकरिता विशेष कार्यक्रम हाती घेण्याचे ठरले. यासाठी 'अधिक धान्य पिकवा' (grow more Food Campain) आंदोलन सुरु झाले. १९४९ मध्ये भारताला अन्नधान्य उत्पादनामध्ये स्वावलंबी बनविण्याचे प्रयत्न सुरु झाले.

भारतात १९६५ ते १९६६ या दोन वर्षातील अवर्षणामुळे अन्नधान्य उत्पादनात लक्षणीय घट झाली. त्यामुळे अन्नधान्य उत्पादनात वाढ करण्यासाठी विविध उपयोजनाची गरज राज्यकर्त्यांना वाटू लागली. अशा योजना विस्तृत क्षेत्रावर राबविण्याऐवजी मर्यादीत प्रदेशात एकत्रित स्वरुपात करणे योग्य वाटल्याने तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात १९६१—६६ मध्ये साधन शेतीचा जिल्हा कार्यक्रम काही निवडक जिल्ह्यामध्ये सुरु करण्यात आला. भारतात हरितक्रांतीचे नवे पर्व सुरु झाले हरितक्रांतीचा उद्देश उत्पादन वर्धक बियाणे आणि बहुविध पिक पद्धती ज्यामुळे कृषी विकास घडून येईल. हरितक्रांतीनंतर भारतात संकरित बियानाबरोबरच, रासायनिक खते, औषधे, जलसिंचनाच्या विविध पद्धती यांचा प्रचार, प्रसार, वापर, करण्यात आला. त्यामुळे कृषी अन्नधान्य उत्पादन ३० दशलक्ष टनावरून आज २५७ दशलक्ष टनावर पोहचले आहे. देशाला भासणारा अन्नधान्य टंचाईचा प्रश्न सोडविण्यात यश प्राप्त झाले.

हरितक्रांतीमुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला असला तरी कोरडवाहू

क्षेत्राचे प्रमाण अधिक असल्याने हरितक्रांतीचा पूर्ण लाभ झाला नाही. भारतातील जलसिंचनाच्या सोयी दिवसेदिवस वाढताना दिसतअसल्या तरी या वाढीचा वेग अतिशय संथ आहे आजही भारतातील शेती निसर्ग लहरीवर अवलंबून आहे. त्यामुळे कृषीची अल्प उत्पादकतेची समस्या सातत्याने आढळते.

१९९१ मध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, (नवीन आर्थिक धोरण) कार्यक्रम राष्ट्रीय पातळीवर राबविण्यास सुरुवात झाली. जागतिकीकरणाचा प्रभाव देशाच्या, राज्याच्या जीवनावर झाला. नंतर शेतीचे व्यापारीकरण अतिशय झपाट्याने सुरु झाले. मुक्त व्यापार, शेतीमधून अल्पकाळात प्रचंड उत्पादन, नफेखोरी प्रवृत्ती वाढू लागली. आज संपूर्ण बाजारव्यवस्था बदलत आहे. पुरवठा प्रधान शेती मागे पडत असून मागणीप्रधान शेती उदयास येत आहे. मुक्त व्यापारामुळे विदेशी वास्तूशी स्पर्धा वाढत आहे. शेतमालाच्या जागतिक मागणी पुरवठ्यातील चढउतारामुळे देशांतर्गत शेतमालाच्या किमतीत अस्थिरता वाढत आहे. कृषी उद्योगाला या सर्व परिस्थितीशी सामना करावा लागत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रापुढे नवनवीन आव्हाने निर्माण होत आहेत.

केवळ अन्नधान्य उत्पादन वाढणे म्हणजे कृषी विकास झाला असे म्हणता येणार नाही. स्वातंर्त्य पूर्व काळापासून तर आजपर्यंतचा विचार करता अनेक समस्या ह्या सातत्याने प्रयत्न करून देखील वाढत आहेत आज कृषी क्षेत्रात सातत्याने अनिश्चितता वाढत आहे. या अनिश्चीतावर मत करण्याची मोठे आव्हान कृषी क्षेत्रापुढे निर्माण झाले आहे. भारतातील शेती क्षेत्र निसर्गलहरीवर आधारित आहे. जी शेती केली जाते ती कोरडवाहू त्यामुळे पिकांची शाश्वती नाही. कृषी उत्पादकता अल्प आढळते. शिवाय पतपुरवठ्यात अनिश्चितता, अनिश्चित शासकीय धोरणे, महाग खते—बियाणे, कीटकनाशके, शेतकऱ्याच्या वाढत्या आत्महत्या, अनेक प्रश्न कृषी क्षेत्रात वाढताना दिसतात.नवीन आर्थिक धोरणामुळे कृषी क्षेत्रासमोर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. मुक्त व्यापाराप्रनालीमुळे विदेशी मालाशी स्पर्धा सातत्याने वाढत आहे. कृषी अनुदाने कमी झाल्याने उत्पादनाच्या किमती वाढत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या अभावामुळे, अज्ञानामुळे अनेक शेतकरी स्पर्धेपुढे टिकू शकत नाहीत. त्यामुळे कृषी विषयक अनास्था लोकामध्ये निर्माण झालेली दिसते. स्वातंष्यानंतर भारताने आर्थिक नियोजनाचा मार्ग स्वीकारून त्यानुसार प्रत्येक पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्रावर कोट्यवधी रुपये खर्च केले परंतु भारतीय स्वातंष्याचा अमृत महोत्सवी प्रसंगी स्वतंत्र प्राप्तीवेळची भारतीय शेती आणि ७५ वर्षात बदलेली शेती विचारात घेतल्यास भारतिय शेतीसमोर अनेक आव्हाने समस्या आहेत. आव्हाने पेलण्यासाठी व समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना करणे काळाची

गरज आहे.

**भारतीय शेतीसमोरील आव्हाने :**

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने कृषी विकासासाठी भरपूर प्रयत्न केले यामध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राला अग्रस्थान देवून जमिन सुधारणा, जलसिंचन इत्यादी बाबीकडे लक्ष्य दिले परिणामी कृषी उत्पादनाच्या वृधीदरात वाढ झाली परंतु ही वृधीदारातील वाढ आर्थिक सुधारणा काळात टिकून राहिली नाही. वृध्दीदरात घटीमुळे वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरविणे कठीण झाले त्यामुळे अन्नधान्याच्या पिकांचा वृद्धीदर वाढविणे हे एक भारतीय कृषी क्षेत्रासमोरील आव्हान आहे.

१. भारताच्या काही भागात रासायनिक खते—बियाणाचा अतिरेकी वापर केला जातो. तसेच अतिरिक्त पाण्याचा सुद्धा वापर करतात त्यामुळे जमिनीची पत खालावून उत्पादनात घट झाली. शेतीची सुपीकता टिकविणे हे मोठे आव्हान निर्माण झाले.

२. दिवसेदिवस हवामानात बदल झाल्यामुळे बदलणाऱ्या हवामानात अधिक उत्पादन देणे हे शेतजमिनीसमोर मोठे आव्हान असणार आहे.

३. शेतीकरिता पर्याप्त भांडवलाची गरज असले ज्यामुळे शेतकऱ्यांना कमी व्याजदराने व पर्याप्त मात्रेमध्ये कर्जपुरवठा करणे हे कृषी क्षेत्रासमोरील आव्हान आहे.

४. कृषी क्षेत्रात बदलत्या काळानुसार संशोधनाचा खूप मोठा अभाव आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात संशोधन करून देशातील पडीत जमिन कशी उपयोगात आणता येईल अधिकाधिक पावसात किंवा कमी पावसात कोणते पिक कसे घेता येईल यावर संशोधनाची आवश्यकता आहे.

५. शेतमालाच्या विपणन व्यवस्थेत सुधारणा करणे महत्वाचे आहे.

६. शेतकऱ्यांना उत्पादकता वाढीसाठी दर्जेदार कमी किमतीत आदाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

कृषी क्षेत्रातील आव्हानावर मात करण्यासाठी अनेक उपाय अमलात आणतांना शेतकऱ्यांना शेती संबधीचे शिक्षण, मार्गदर्शन, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे आवश्यक आहे, शासनाने जलसंधारणाची कामे हाती घेणे आवश्यक आहे. विपणन व्यास्थेत सुविधा प्राप्त करून देणे, सेंद्रिय शेतीचा विकास कार्य शेतीचा विकास, दुसरी हरितक्रांती, स्वतंत्र अर्थसंकल्प मांडणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष**

डॉ. रघुनाथराव माशेलकरांनी एका ठिकाणी म्हटले आहे. “आपल्या देशातील

ज्ञानाच्या भांडाराचे आपण संपत्तीमध्ये रुपांतर करत न शकल्याने आपल्याला निसर्गाचे वरदान असूनही जनता गरीब राहिलेली आहे. उद्यमशीलता, विचारशक्ती, बुद्धिमत्ता ज्ञानाची परंपरा यांचे रुपांतर धनामध्ये झाल्यास आपणही इतर प्रगत देशाच्या पंक्तीत जाऊन बसू."

आपले माजी राष्ट्रपती मा. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या तरुणांना उद्देशून म्हटले कि, "२०२० सालापर्यंत विकसित भारत स्वप्न नाही तर हे मिशन आहे आपल्या सर्वांची पेटलेली तरून माने शक्तिशाली असतात. पृथ्वीवरील, आकाशीतील किंवा पाण्याखालील दुसऱ्या कोणत्याही शक्तीपेक्षा ही शक्ती श्रेष्ठ आहे, आपण सर्वांनी विकसनशील भारत विकसित भारत करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करायला हवेत आणि या प्रयत्नासाठी मनामध्ये क्रांतीची ठिणगी पडायला हवी" ते पुढे म्हणतात कि, "हे साधण्यासाठी कृषी क्षेत्रामध्ये प्रगती करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे भान ठेवून कृषी क्षेत्रातील उत्पादन दर्जेदार करण्यावर भर द्यावा लागेल. कृषीधीष्ठीत उद्योगांना महत्व देवून राष्ट्रीय संपत्ती निर्माण करता येईल आणि मालाच्या निर्यातीमध्ये भारत आघाडीवर राहील कृषी क्षेत्रातील उत्पादनक्षम कार्यक्षम व्यक्तींना याव्दारे आकर्षित करता येईल."

## संदर्भ सूची :-

१. डॉ. देशपांडे श्रीधर आत्माराम, डॉ. देशपांडे विनायक श्रीधर— भारतीय अर्थव्यवस्था
२. अतिरिक्त अंक, प्रतियोगिता दर्पण, २०१२—१३ भारतीय अर्थव्यवस्था
३. अर्थ संवाद एपिल—जून २०१२ खंड ३६ अंक १
४. डॉ. चव्हाण एन.एल भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन
५. डॉ. झामरे जी. एन. भारतीय अर्थव्यवस्था पिंपळपुरे